# प्रेस नोट ता. १८/०५/२०२०

## महाकाली गॅगच्या मोरक्याचा खुन करणाऱ्या आरोपीच्या गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांनी १२ तासाच्या आत आवळल्या मुसक्या

दिनांक १७/०५/२०२० रोजी सायंकाळी पुनावळे येथिल, लंडन ब्रिज खाली महाकाली गॅगचा मोरक्या नामे मनोज ऊर्फ डिंगऱ्या फुलचंद धकोडीया, वय-३० वर्षे, रा- आंबेडकर नगर, देहुरोड याचा अज्ञात इसमाने कशाच्या तरी साह्याने खुन केल्या बाबत त्याची पत्नी नामे पुनम मनोज धकोडीया, हिच्या तक्रारी वरुन दि. १८/०५/२०२० रोजी वाकड पोलीस ठाणे गु.र.नं- ४४९/२०२० भा.दं.वि.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

यातिल मयत हा महाकाली गॅगचा मोरक्या नामे राकेश फुलचंद धकोडीया याचा लहान भाऊ असुन त्याचा सन २०११ साली पोलीस इनकाऊंटर मध्ये मुत्यु झाल्या नंतर यातील मयत हा महाकाली गॅग चालवत होता. मनोज ऊर्फ डिंगऱ्या याच्या विरुद्ध गंभीर स्वरुपाचे एकुण ११ गुन्हे नोंद असुन त्याला नोव्हेंबर २०१९ पासुन पुणे जिल्हातुन ०२ वर्षा करीता तडीपार करण्यात आले होते. सदरचा खुनाचा प्रकार हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेस तातडीने तपास करण्या बाबत आदेश दिले होते.

त्या अनुशंगाने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा युनिट- ४, मार्फत सदर प्रकरणाचा समांतर तपास सुरु करण्यात आला. घटनास्थळी व आजुबाजुच्या परिसरात कोणताही भौतिक अथवा तांत्रिक पुरावा मिळुन येत नसल्याने सर्व खबऱ्यांना सतर्क करुन माहिती काढण्याचा पर्यत्न केला असता **पोलीस नाईक ११८६ मोहम्मद गौस नदाफ** यांना त्यांचे बातमीदाराकडुन माहिती मिळाली की पुनावळे स्मशानभुमी येथे झाडाखाली एक संशयित इसम झोपलेला असुन त्याने सदरचा प्रकार केला असणाची दाट शक्यता आहे. मिळालेल्या बातमीच्या अनुशंगाने सपोनि अंबरिष देशमुख यांनी पथका सह सदर संशयित इसमास त्या ठिकाणा वरुन ताब्यात घेवुन गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कार्यालयात आणुन त्याच्याकडे कौशल्याने चौकशी केली असता त्याचे नाव **आदम ऊर्फ गोट्या मोहम्मद खान वय- ३२ वर्षे, मुळ रा- सोमाटणे फाटा, एक्सप्रेस-वे जवळ, सोमाटणे. सद्या रा- पुनावळे स्मशानभुमी, पुनावळे, ता. मुळशी, जि. पुणे. असे असल्याचे** व त्याने दि. १७/०५/२०२०२० रोजी सायंकाळी २०:०० वाजण्याच्या दरम्यान तो व मयत हे दोघे लंडन ब्रिजखाली दारु पित असताना त्यांचे झालेल्या भांडणातुन मनोज ऊर्फ डिंगऱ्या फुलचंद धकोडीया हा दारु पिवुन झोपलेला असताना त्याचा डोक्यात बांबुने मारुन त्याचा खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

**आरोपी नामे आदम ऊर्फ गोट्या मोहम्मद खान याचे विरुद्ध घरफोडी, जबरी चोरीचे एकुण ०९ गुन्हे दाखल असुन तो सुद्या रेकॉर्ड वरील गुन्हेगार आहे.**

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. श्रीधर जाधव, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पो.हवा. संजय गवारे, नारायण जाधव, प्रविण दळे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ, पो. ना. मोहम्मद गौस नदाफ, लक्ष्मण आढारी, तुषार शेटे, संतोष असवले, वासुदेव मुंडे, पो. शि. शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गुन्हे शाखा यांनी केली आहे.

( मोहन दा.शिंदे )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड

CS Scanned with CamScanner

Scanned with CamScanner